## अनुसूची अ

## गा-हाण्याच्या निवारणासाठी मंचाकडे करावयाचा अर्ज

दिनांक---------

१. ग्राहकाचे नांव----------------------------------

२. ग्राहकाचा पूर्ण पत्ता -------------------------------------------------------
पिन कोड --------------
दूरध्वनी क्र. ------------
फॅक्स क्र. --------------
ई-मेल पत्ता ------------

३. वीज जोडणीचा तपशील आणि ग्राहक क्रमांक -------------
(जोडणीचे स्वरुप कृपया लिहावे )

४. वितरण परवानाधारक ------------------------

५. गा-हाण्याचा तपशील, गा-हाणे उद्भवण्याची परिस्थिती ------------------------------
--------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
(जागा अपूरी पडल्यास वेगळी पाने जोडावीत)

६. ग्राहकाने वितरण परवानेधारकाला (अंतर्गत गा-हाणे निवारण कक्षाला) गा-हाणे कळविल्याचा मूळ दिनांक ---------

७. वितरण परवानेधारकाने केलेली (असल्यास) उपाययोजना
(जर काही उपाययोजना करण्यात आली असेल तर वितरण परवानेधारकाकडून आलेल्या संबधीत पत्राची प्रत कृपया जोडावी)

८. मंचाकडून अपेक्षित मदतीचे स्वरुप --------
(दाव्याच्या पुष्टयर्थ कोणताही पुरावा, असल्यास, कृपया जोडावा)

९. सोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी
(गा-हाणे उद्भवण्यामागील वस्तुस्थितीच्या पुष्टयर्थ असलेल्या कोणत्याही संबंधित कागदपत्रांच्या प्रती कृपया जोडाव्यात )

२८.३ मंचाची रचना तसेच सदस्यांची अर्हता, रिक्त होणारी पदे आणी इतर सांख्यिकी माहिती, आयोग सांगेल त्या वेळी आणि त्या रितीने व पध्दतीने, आयोगास देणे हे प्रत्येक वितरण परवानाधारकाचे कर्तव्य राहील.

परंतु असे की, मंचातील एखाद्या सदस्याचे पद तीन महिन्यांहून अधिक काल रिक्त असल्यास त्याबाबत वितरण परवानाधारक आयोगास लगेच कळवेल.

**२९. मंच (मंचांची) आणि विद्युत लोकपालाच्या कामकाजाची भाषा**

मंच आणि विद्युत लोकपालाकडे दाखल करावयाची गा-हाणी/ अभिवेदने व तसेच मंच आणि विद्युत लोकपालाचे कामकाज मराठी किंवा इंग्रजीत चालेल.

**३०. खर्चास मान्यता**

वितरण परवानेधारकाने मंचाच्या तसेच विद्युत लोकपालाच्या आस्थापना व कामकाजावर केलेला खर्च, त्यापैकी जो वाजवी व समर्थनीय असेल तो, आयोगाने विहीत केलेल्या वीज दराच्या अटी व शर्तींनुसार वितरण परवानेधारकाचा विजेचा दर निश्चित करताना मान्य करण्यात येईल.

**३१. अभिलेख्यांचे जतन**

आयोगाने वेगळे निदेश दिले नसल्यास, मंच आणि विद्युत लोकपालाच्या कार्यालयात गा-हाणे/अभिवेदन तसेच अंतरिम/ अंतिम आदेश यांचे अभिलेखे अंतिम आदेश पारित केल्याच्या दिनांकापासून किमान तीन (३) वर्षांच्या कालावधीकरिता जतन केले जातील.

सही/-
(मालिनी शंकर, भा.प्र.से.)
सचिव,
१महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई,
दिनांक- १९ एप्रिल, २००६

१० निवेदन

(अ) मी / आम्ही, ग्राहक खालीलप्रमाणे जाहीर करतो की -

(१) येथे वरीलप्रमाणे दिलेली माहिती सत्य व बरोबर आहे, आणि

(२) मी/आम्ही येथे वरीलप्रमाणे नमूद केलेल्या माहितीत आणि सोबत सादर केलेल्या कागदपत्रात कोणतीही वस्तुस्थिती दडवलेली नाही किंवा तिचा विपर्यास केलेला नाही.

(ब) वितरण परवानेधारकाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये आणि पध्दतीने व काल-मर्यादेत हे गा-हाणे वितरण परवानेधारकाला कळविण्यात आलेले आहे आणि माझे/आमचे वितरण परवानेधारकाने केलेल्या उपाययोजनेमुळे समाधान झालेले नाही किंवा गा-हाणे कळविण्यात आल्याच्या मूळ दिनांकापासून दोन (२) महिन्यात कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही.

(क) मला/आम्हाला ज्ञात असणा-या माहितीनुसार या गा-हाण्याचा विषय मी किंवा आमच्यापैकी कोणीही किंवा या विषयाशी संबंधीत असणा-या कोणत्याही पक्षकाराने मंचासमोर यापूर्वी कधीही सादर केलेला नाही.

(ड) माझ्या/आमच्या या गा-हाण्याचा विषय मंचाने या पूर्वीच्या कोणत्याही कामकाजात निकाली काढलेला नाही.

(इ) माझ्या/आमच्या या गा-हाण्याच्या विषयावर कोणत्याही सक्षम प्राधिकरण/न्यायालय/लवादाने निर्णय दिलेला नाही आणि अशा कोणत्याही प्राधिकरण/न्यायालय/लवादापुढे प्रलंबित नाही.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

(ग्राहकाचे नाव व स्वाक्षरी )

**नामनिर्देशन** (जर ग्राहकास मंचासमोर त्याच्या वतीने उपस्थित राहण्यास व निवेदन सादर करण्यास प्रतिनिधी नामनिर्देशीत करावयाचा असेल तर त्याने खालील प्रतिज्ञापन सादर करावे).

मी/आम्ही, वर नमूद केलेले ग्राहक, याद्वारे श्री / श्रीमती --------------------------- हे अधिवक्ता नसून त्यांचा पत्ता ------------------------------------------------------------ ------------------------असा असून त्यांना मी / आम्ही या कार्यवाहीत आमचा **प्रतिनिधी** म्हणून नामनिर्देशीत करत आहे/आहोत आणि मान्य करतो की त्याने/तिने केलेले कोणतेही निवेदन, दिलेली मान्यता किंवा नकार हा माझ्यावर/आमच्यावर बंधनकारक राहील. त्याने/तिने माझ्यासमोर खाली सही केली आहे.

वरीलप्रमाणे मान्य आहे.

(प्रतिनिधीची स्वाक्षरी)

(ग्राहकाची स्वाक्षरी)